**महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत अधिक्षक / निरीक्षक, प्रमाणित शाळा व संस्था / रचना व कार्यपध्दती अधिकारी/ अधिव्याख्याता / जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी / सांख्यिकी अधिकारी गट-ब (राजपत्रित) आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयांतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) या पदांवर निवडीद्वारे नियुक्तीकरीता मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा**

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| संवर्ग/पदाचे नांव | संवर्ग | वेतनसंरचना (Pay Matrix) | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत अधिक्षक / निरीक्षक, प्रमाणित शाळा व संस्था / रचना व कार्यपध्दती अधिकारी/ अधिव्याख्याता / जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी / सांख्यिकी अधिकारी गट-ब (राजपत्रित) आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयांतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) गट-ब (राजपत्रित) | **गट-ब राजपत्रित** | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही. |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरातीद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** लेखी परीक्षा –४०० गुण, मुलाखत - ५० गुण

**२.२** लेखी परीक्षा आणि मुलाखतीमधील एकत्रित गुणांच्या आधारे अंतिम निवड करण्यात येईल.

**३.पात्रता:-**

**३.१** फक्त **महिला व बाल विकास विभागातील आणि ग्राम विकास विभागातील खाली नमूद संवर्गातील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस अर्ज सादर करण्यास पात्र असतील :-**

| महिला व बाल विकास विभागातील संवर्ग | | ग्राम विकास विभागातील संवर्ग | |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिविक्षा अधिकारी, अधीक्षक (शासकीय संस्था), निरीक्षक, प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ), मुख्य अधिकारी, प्रभारी अधिकारी, कार्यकारी सचिव (गट-क), | १ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क), विस्तार अधिकारी (कृषी) |
| २ | परिविक्षा अधिकारी, उप अधीक्षक, सहायक निरीक्षक (प्रमाणित शाळा) (गट-क) | २ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क), सहायक पशुधन विकास अधिकारी |
| ३ | कार्यालयीन अधीक्षक (गट-क) | ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क), विस्तार अधिकारी (शिक्षण), |
| ४ | मुख्यसेविका (गट-क) | ४ | जिल्हा सेवा (वर्ग-क) सहायक प्रशासन अधिकारी (लिपिक संवर्ग) |
| ५ | समुपदेशक (गट-ब) (अराजपत्रित) | ५ | जिल्हा सेवा (गट-क), विस्तार अधिकारी (सांख्यिकी), |
| ६ | संरक्षण अधिकारी (गट-ब) (अराजपत्रित) | ६ | जिल्हा सेवा (गट-क), विस्तार अधिकारी (पंचायत), |
| ७ | विधि सल्लागार (गट-ब) (अराजपत्रित) | ७ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क) (समाज कल्याण) (पर्यवेक्षिका तसेच व्यपगत होणारा सहायक बाल विकास प्रकल्प अधिकारी हा संवर्ग), |
| | | ८ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट-क), (आरोग्य पर्यवेक्षक) (विस्तार). |

**३.२ उपरोक्त परिच्छेद ३.१ मधील तक्त्यामध्ये नमूद पद धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ज्यावर्षी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेचे आयोजन करणे प्रस्तावित आहे, त्या वर्षाच्या ०१ जानेवारी रोजी तक्त्यातील पदावर सलग सात वर्षे विनाखंड नियमित सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.**

**३.३** उपरोक्त परिच्छेद ३.१ मधील तक्त्यामध्ये नमूद पदावरील नियमित सेवेचा ७ वर्षाचा कालावधी कालावधी खालीलप्रमाणे गणण्यात येईल :-

**(एक)** नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी, नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून.

**(दोन)** पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी, नियमित पदोन्नतीच्या दिनांकापासून.

**(तीन)** अनुकंपा तत्वावर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी, नियुक्तीच्या दिनांकापासून.

**(चार)** अन्य कारणास्तव सेवा नियमित झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांची सेवा नियमित झालेल्या दिनांकापासून

**३.४** जिल्हा परिविक्षा अधिकारी संवर्गाच्या बाबतीत नियमित किमान ७ वर्ष सेवा पूर्ण केल्याची गणना करताना परिविक्षा अधिकारी व जिल्हा परिविक्षा अधिकारी या संवर्गात केलेली सेवा एकत्रितरित्या विचारात घेण्यात येईल.

**३.५** शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.), क्रमांक: मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०२१ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

३.६ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार मराठी भाषा परीक्षा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण असणे किंवा ज्यांनी यापूर्वीच सदर परीक्षा उत्तीर्ण केली आहे अथवा सदर परीक्षा देण्यापासून सूट मिळाली असणे आवश्यक आहे.

**४. निवडप्रक्रिया :-**

**४.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**४.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया " महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत गट-ब(राजपत्रित) पदे आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयांतर्गत गट-ब (राजपत्रित) पदे (मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा) नियम २०२४ अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल .

**५. शुल्क (फी ) :-**

**५.१ परीक्षा शुल्क:-**

(१) अमागासवर्गीय रुपये ७१९ /- (२) मागासवर्गीय/आ.दु.घ./दिव्यांग - रुपये ४४९/-

**५.२** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग, आणि सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**५.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेअर)उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**५.४** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी विहित आर्थिक वर्षाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**६. परीक्षा योजना :-**

**६.१** प्रश्नपत्रिका - दोन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

<table>
<tr><th>पेपर क्रमांक व विषय संकेतांक</th><th>विषय</th><th>दर्जा</th><th>माध्यम</th><th>प्रश्नसंख्या</th><th>गुण</th><th>कालावधी</th><th>प्रश्नपत्रिकेचे स्वरुप</th></tr>
<tr><td rowspan="4">पेपर – १ (२०३)</td><td>मराठी</td><td>बारावी</td><td>मराठी</td><td rowspan="4">१००</td><td rowspan="4">२००</td><td rowspan="4">एक तास</td><td rowspan="4">वस्तुनिष्ठ बहुपर्यायी</td></tr>
<tr><td>इंग्रजी</td><td>पदवी</td><td>इंग्रजी</td></tr>
<tr><td>सामान्य ज्ञान,</td><td>पदवी</td><td rowspan="2">मराठी</td></tr>
<tr><td>शासनाशी संबंधित निवडक कायदे व संस्था, इ.</td><td>विभागामध्ये काम करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान</td></tr>
<tr><td>पेपर - २ (२०४)</td><td>पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान</td><td>--</td><td>मराठी</td><td>१००</td><td>२००</td><td>एक तास</td><td>वस्तुनिष्ठ बहुपर्यायी</td></tr>
<tr><td colspan="5">मुलाखत</td><td>५०</td><td>--</td><td>--</td></tr>
</table>

**६.२ अभ्यासक्रम** :- सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील **Candidate Information > Examination > Syllabus of Examination** या सदराखाली उपलब्ध आहे.

**६.३** परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारची पुस्तके, संदर्भ ग्रंथ, टिप्पण्या इत्यादींचा वापर करता येणार नाही.

**७. परीक्षा केंद्र : -**

परीक्षा फक्त नवी मुंबई केंद्रांवर घेण्यात येईल.

**८. अंतिम निकाल :-**

**८.१. उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**८.१.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**८.१.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

८.१.३ एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

८.१.४ वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

८.२ लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार निश्चित करण्यात येईल

**९. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

९.१ पदाच्या/संवर्गाच्या अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.२ तात्पुरती निवड यादीच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (**Opting out**) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

९.३ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

९.४पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**१०. शिफारस :-**

१०.१ **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

१०.२ लेखी परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरिता शतमत (**Percentile**) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या **३५ शतमत तसेच दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत एकूण गुणांच्या २० शतमत एवढे** किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील .

१०.३ शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

१०.४ शिफारसीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**११. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

११.१ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण

(३) गुणांची किमान सीमांकन रेषा.

११.२ वरील तपशील उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिल्यानंतर याबाबतची माहिती उमेदवारांना संकेतस्थळावर प्रसिद्धीपत्रकाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**१२. प्रमाणपत्र पडताळणी :-**

१२.१ लेखी परीक्षा व मुलाखतीच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी संबंधित विभागाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या ठिकाणी व वेळेस करण्यात येईल.

१२.२ आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरातीमधील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

१२.३ अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

१२.४ विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

१३. प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात, संबंधित शासन निर्णय तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

दिनांक :- ०३ नोव्हेंबर, २०२५

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

********************